अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## पुण्याच्या हद्दीपासून आत येण्यास जड वाहनांना बंदी

**पुणे/प्रतिनिधी**

पुण्यातून पिंपरी चिंचवड, मुंबई, सातारा, सोलापूर, अहमदनगर व इतर ठिकाणी जाणाऱ्या व येणाऱ्या जड वाहनांना शहराच्या हद्दीत प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. येत्या मंगळवार पासून या नियमांची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

पुणे शहरात मोठया प्रमाणात वाहनांची संख्या वाढली आहे. त्यात शहरात विविध मोठे प्रकल्प (मेट्रो, उड्डाणपूल, विविध विकासकामे) सुरू असून अवजड वाहनांमुळे रस्त्यावरील जागा मोठ्या प्रमाणावर व्यापली जाऊन वाहतूकिस अडथळा निर्माण होत आहे. नागरिकांना धोका निर्माण होण्याबरोबरच त्यांची गैरसोय होते. त्यामुळे जड- अवजड माल वाहतूक करणारे ट्रेलर, कंटेनर्स, मल्टी ॲक्सल वाहने वाहनांसाठी प्रायोगिक



तत्वावर पाच मार्चपासून शहरात प्रवेश बंदीचे आदेश वाहतूक शाखेचे उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी नव्याने काढले आहेत.

www.surajyadigital.com । सोमवार, दि. ४ मार्च २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १५५ वा किंमत : ५ रुपये पाने ८

# पोटच्या गोळ्यांना गळफास देत मातेची आत्महत्या

## तिघांचे मृतदेह पाहून सरवदेनगरमध्ये हळहळ; कारण अद्याप अस्पष्ट

**सोलापूर/प्रतिनिधी**


**आपल्या दोन लेकरांना गळफास दिल्यानंतर मातेने स्वत: गळफास घेऊन आत्महत्या करण्याची खळबळजनक घटना मुळेगाव तांडा येथे आज सकाळी घडली. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असून हे टोकाचे पाऊल का उचलले असावे याबाबत तर्कवितर्क लढवले जात होते. स्नेहा संतोश चिल्लाळ (वय ३२) व मुलगी संध्या (वय ११) आणि मुलगा मनोज (वय ७) अशी मृतांची नावे आहेत.**



स्नेहा चिल्लाळ



संध्या चिल्लाळ



मनोज चिल्लाळ

घटनास्थळ आणि पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुळेगांवतांडा येथील सरवदेनगरमध्ये राहणारे संतोष चिल्लाळ यांच्या घरात ही खळबळजनक घटना घडली. सतोष यांनी रविवार असल्यामुळे मटण आणि मासे खरेदी करून पत्नीस फोन केला. मात्र पत्नीने फोन उचलला नाही. पत्नी फोन उचलत नसल्याने त्यांनी थेट घर गाठले. बाहेरच्या गेटला आतून कुलूप लावले होते. तेंव्हा संतोष यांनी गेटवरून उडी मारून घरात प्रवेश केला.

संतोष यांचे घर दुमजली आहे. खालच्या मजल्यावर कोणीही नाही हे पाहून संतोष वरच्या मजल्यावर गेले. तेथे संतोष यांची पत्नी स्नेहा व मुलगी संध्या आणि मुलगा मनोज हे तिघे सुध्दा घरात साडीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळले. तेंव्हा संतोष चिल्लाळ यांच्या पायाखालची वाळू सरकली.

त्यांनी शेजारच्यांना बोलावून तिघांचे मृतदेह काढून एका सतरंजीवर ठेवले. त्यानंतर कोणीतरी एमआयडीसीचे पोलिस कॉन्स्टेबल श्रीधर गायकवाड यांना फोन करून घटना कळविली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. अद्याप तिघांनी गळफास का घेतला याचे कारण समजून शकले नाही.

मुळेगांव तांडा येथील सरवदे नगरात संतोष चिल्लाळ हे आई, वडील, पत्नी, मुलगी व मुलगा यांच्यासह रहात होते.

संतोष चिल्लाळ व त्याचे आई-वडिल यांचा विडी घरकुल एच ग्रुप हे हॉटेल आहे. रोज सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास संतोष चिल्लाळ हे आई-वडिलांना घेवून हॉटेल उघडण्यासाठी जात होता. चिल्लाळ यांचे हॉटेल चांगले चालत होते. चिल्लाळ यांची घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. मध्यमवर्गीय कुटूंब असल्यामुळे घरात भांडणे होत नव्हती.

### टोकाचे पाऊल का उचलले?

घरात सुबत्ता असताना एवढ्या टोकाचे पाऊल का उचलले असावे या विषयी उलट सुलट चर्चा सुरु झाली. संतोष यांना कोणतेही व्यसन नव्हते. तसेच त्यांची घरात भांडणे झालेली आम्ही कधी ऐकली नाहीत. स्नेहा याही शेजाऱ्यांशी व्यवस्थित वागत असत. त्यामुळे या टोकाचे पाऊल उचलले गेल्याने गल्लीत त्याच्या कारणाबाबत तर्क वितर्क लढवले जात होते.

संतोष यांची मुलगी संध्या व मुलगा मनोज हे दोघे अरिहंत इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये शिकत होते. दि. ३ मार्च रोजी सकाळी रोजच्या प्रमाणे ६ वाजता संतोष चिल्लाळ हे आई-वडिलांना घेवून जुना विडी घरकुल एच ग्रुप येथील लक्ष्मी बँकेसमोरील भारत-विलास या नावाचे स्वत:चे हॉटेल चालू करण्यासाठी गेले. संतोष व त्याचे आई-वडील हे तिघे हॉटेलला गेल्यावर मुळेगांव तांडा येथील सरवदे नगरातील घरात संतोष यांची पत्नी स्नेहा, मुलगी संध्या व मुलगा मनोज हे तिघेच होते.

त्यानंतर संतोष हे भेदरलेल्या अवस्थेत बाहेर आले व शेजाऱ्यांना घटना सांगितली. व शेजारच्यांना बोलावून गळफास घेतलेल्या पत्नी, मुलगी व मुलगा यांचे मृतदेह उतरवून खाली ठेवले. त्यानंतर कोणीतरी ही घटना एमआयडीसी पोलिसांना कळविली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून जागेचा पंचनामा केला. व तिन्ही मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी शासकिय रूग्णालयात पाठवून दिले.

अचानक घडलेल्या या घटनेमुळे शेजाऱ्यांसह परिसरातील नागरिक हबकून गेल्याचे चित्र होते.

## वंचितबाबत आघाडीत संदिग्धता

### महाआघाडीत दोन -तीन दिवसांत जागावाटप होण्याचे संकेत

**मुंबई/विशेष प्रतिनिधी**

महाविकास आघाडीत पुढील आदेश येईपर्यंत कोणीही सहभागी न होण्याचा आदेश देत वंचित बहुजन विकास आघाडीचे सर्वे सर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वत:विषयी संदिग्धता निर्माण केली. दरम्यान, आघाडीतील महत्वाचे घटक असणाऱ्या शिवसेनेने आणि काँग्रेसने मात्र आंबेडकर महाआघाडी सोबत



येतील असा विश्वास व्यक्त केला. वंचित आघाडी स्वतंत्र लढल्यास त्याचा सर्वाधिक लाभ भाजपाला होईल, अशी अटकळ राजकीय वर्तुळात बांधण्यात येत आहे. महाआघाडीचे जागा वाटप येत्या दोन तीन दिवसांत होईल. त्यानंतर आंबेडकर आमच्यसोबत ठामपणे आल्याचे दिसेल, असे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर नुकतेच एक व्हिडीओ पोस्ट केला. या व्हिडीओत त्यांनी वंचितच्या कार्यकर्त्यांना आवाहन केलंय. वंचित बहुजन आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांना आवाहन आहे की,

(पान ७ वर)

## आचारसंहितेपूर्वी ओबीसीमधून मराठ्यांना आरक्षण

### जरांगे-पाटील; लव्हे येथे व्यक्त केला विश्वास

**करमाळा/प्रतिनिधी**

आचारसंहिता लागण्यापूर्वी ५० टक्यांच्या आत ओबीसीमधून कुणबी नोंदी निघालेल्या सग्यासोयऱ्यांना आरक्षण देण्यासंबंधीचा निर्णय १०० टक्के होईल, असा विश्वास मराठा आरक्षणाचे नेते मनोज-जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.

श्री. जरांगे-पाटील हे संवाद दौऱ्यावर आहेत. आज रविवारी (ता.३) त्यांनी करमाळा तालुक्यातील लव्हे गावात सकल मराठा समाज बांधवांशी संवाद साधला. मराठ्यांची एकजूट कि कायम राहिली पाहिजे, ती कायम राहण्याचे आवाहन



आपण करीत आहोत, असेही ते म्हणाले. आरक्षण मिळूवन देऊन आपल्या मुलाबाळांना न्याय देण्यासाठी मी इंचभरदेखील मागे हटणार नाही. मराठा आरक्षण मिळविण्यासाठी जीव जरी गेला तरी माघार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. कोणत्याही परिस्थितीत मराठ्यांची एकजूट राहायला हवी असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### जरांगे-पाटील आजही सोलापूर जिल्ह्यात

मराठा आरक्षणाचे नेते मनोज-जरांगे पाटील हे आजही दिवसभर सोलापूर जिल्ह्यात आहेत. त्यांचा दौरा याप्रमाणे : सकाळी बार्शी येथून ८:३० वाजता सौंदरे, पानगाव आणि मानेगाव माग वैरागला सभाठिकाणी पोचतील. वैराग येथे सकाळी ९ वाजता सभा होईल. त्यानंतर सर्जापूर येथे थांबतील. तद्नंतर सर्जापूरहून दहिटणे, मुंगशी, वाळूज, देगाव, नरखेड, मलिकपेठ मार्गे मोहोळला पोचतील. सकाळी ११ वाजता मोहोळला सभा होईल. त्यानंतर यावली, चिखली, वडाचीवाडी, तेलंगवाडी मार्गे शेटफळला पोचतील. दुपारी १ वाजता येथे संवाद सभा घेणार आहेत.

## किंचक नवलेला अखेर अटक

**सातारा** : तीन मिनिटांत सगळे ब्राह्मण संपवतो, देवेंद्र फडणवीसांना ठार करतो म्हणत धमकी देणारा किंचक नवले याला सातारा पोलिसांनी किंचक नवलेला अटक केली आहे. त्याला ७ मार्च पर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत अत्यंत खालच्या भाषेत आणि प्रक्षोभक भाषेत किंचक नवलेने टीका केली. प्रक्षोभक भाषेत वक्तव्य करतानाचा किंचक नवलेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. याच प्रकरणात किंचक नवलेला अटक करण्यात आली आहे. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर किंचक नवलेचा शोध घेण्यात येत होता. तो वेशांतर करुन वेगवेगळ्या ठिकाणी फिरत होता. आता सातारा गुन्हे शाखेच्या मदतीने मुंबईतल्या सांताक्रूझ पोलिसांनी शनिवारी त्याला सातारा येथील बाजार या ठिकाणाहून अटक केली. याआधी योगेश सावंत यालाही अटक करण्यात आली आहे.

## हर्षवर्धन यांची राजकीय क्षेत्रातून निवृत्ती

**नवी दिल्ली/विशेष प्रतिनिधी**

उमेदवारी नाकारल्यामुळे दिल्लीतील चांदनी चौकचे खासदार आणि ज्येष्ठ भाजपा नेते डॉ. हर्षवर्धन यांनी सक्रीय राजकारणाला रामराम ठोकला. त्यांच्या मतदारसंघात उद्योजक प्रवीण खंडेलवाल यांना उमेदवारी देण्याच्या दुसऱ्या दिवशी हा निर्णय त्यांनी घेतला.

हर्षवर्धन हे दिल्लीत पाच वेळा आमदार म्हणून तर दोन वेळा खासदार म्हणून मोठ्या मताधिक्याने निवडून आले. त्यांनी राजकीय निवृत्तीनंतर पुन्हा आपल्या वैद्यकीय व्यवसायाकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा पूर्व दिल्लीतील किशननगर भागात स्वत:चा दवाखाना आहे. ते कान नाक घसा तज्ज्ञ आहेत.

### भाजपची उमेदवारी पवनसिंह यांनी नाकारली

कोलकाता : पश्चिम बंगालमधील आसनसोल लोकसभेसाठी भोजपुरी अभिनेते आणि गायक पवन सिंह यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. मात्र त्यांनी आज रविवारी आपण निवडणूक लढविण्यास इच्छूक नसल्याचे सांगितले. एक्स वर एक पोस्ट टाकून त्यांनी निवडणूक लढविता येणार नसल्याचे सांगितले आहे.

दिल्लीतील आणखी एक खासदार गौतम गंभीरनेही आपली निवृत्ती जाहीर करून आपण क्रिकेटच्या मैदानाकडे पुन्हा वळण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला त्याचा फटका दिल्लीत बसण्याची शक्यता राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त केली जात आहे.

## माढा राष्ट्रीय समाज पक्षाला सोडण्यास तयार

### शरद पवार यांचे संकेत; धनगर समाजाचा उमेदवार देणार

**बारामती/प्रतिनिधी**

मी लोकप्रतिनिधीत्व केलेला माढा हा आमचा हक्काचा मतदारसंघ राष्ट्रीय समाज पक्षाला देण्यास आम्ही तयार आहोत, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी दिले. त्यांनी महादेव जानकर आमच्या सोबत आले तर त्यांचे स्वागतच आहे, असेही स्पष्ट केले.

बारामतीतील गोविंद बाग येथील निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चे दरम्यान शरद पवार यांनी ही इच्छा व्यक्त केली. अनौपचारिक चर्चेत पत्रकारांनी सहज विचारलेल्या प्रश्नावर पवारांनी वरील मत व्यक्त केले. ते म्हणाले, वंचित बहुजन आघाडीला सोबत घ्यायला हवे. प्रकाश आंबेडकर यांनी सहा जागा आमच्या निवडून येऊ शकतात, असे मत व्यक्त केल्याचे पत्रकारांनी लक्षात आणून देतात पवार म्हणाले की, हो प्रकाश आंबेडकर यांची काही मतदारसंघात चांगली ताकद आहे. त्यामुळेच त्यांना बरोबर घेण्याची आमची इच्छा आहे. त्यांनी २७ जागांच्या ठिकाणी आमची ताकद असल्याचे पत्र महाविकास आघाडीला दिलेले आहे. येत्या सहा व सात मार्च रोजी मुंबईत




महाविकास आघाडीची लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपासाठी महत्त्वाचे बैठक होत आहे,यामध्ये ही चर्चा होईल. दरम्यान राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांना बरोबर घेणार आहात का? असा प्रश्न विचारला असता राष्ट्रीय समाज पक्षाने या प्रक्रियेत सोबत असायला हवे. माढा लोकसभा मतदारसंघात मी यापूर्वी २००९ ते २०१४ या काळामध्ये लोकसभेचे प्रतिनिधित्व केले आहे. हा हक्काचा मतदारसंघ धनगर समाजाला देण्याची आमची इच्छा आहे, असे पवार म्हणाले.

(पान ७ वर)

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुझी जमीन सोन्याची होणार आहे !

## सांगोल्याच्या डाळिंबांना ‘डॉलर’चा भाव



- समुद्रामार्गे ४२५८ पेट्यांचा कंटेनर अमेरिकेकडे
- अमेरिकन चलन आल्याने ग्रामीण अर्थ व्यवस्था सुधारणार

**सोलापूर/प्रतिनिधी**

**अमेरिकेने भारतातून डाळिंब आयातीस बंदी घातली होती. त्यामुळे गेली ५-६ वर्षे अमेरिकेस डाळिंब निर्यात होऊ शकली नाही. ही निर्यातबंदी उठविण्याबाबत अपेडा व एन.पी.पी.ओ. भारत सरकार यांनी संयुक्तरीत्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यानुसार सन २०२२ पासून अमेरिकेने घातलेली निर्यात बंदी उठवली. त्यामुळे डाळींबाची पहिली प्रायोगिक तत्वावरील व्यावसायिक खेप समुद्रमार्गे यशस्वीरित्या अमेरिकेला रवाना केली आहे. कृषी आणि प्रक्रियाकृत खाद्य उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाच्या (अपेडा) माध्यमातून वाशी (नवी मुंबई) येथील आयएनआय फार्म्सद्वारे ही खेप पाठवण्यात आली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव राजेश अग्रवाल आणि अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव यांनी डाळिंबाच्या ४२५८ पेट्यांच्या (१४ टन) खेपेला हिरवा झेंडा दाखवला.**

महाराष्ट्रातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना निर्यातबंदी उठल्यानंतर मोठा दिलासा मिळाला असून प्रथमच भारतातून अमेरिकेला समुद्रमार्गे डाळिंब निघाली आहेत.सन २०१७-२०१८ मध्ये डाळिंबाच्या दाण्यात फळमाशीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अमेरिकेने भारतातून डाळिंब आयातीस बंदी घातली होती. त्यामुळे गेली ५-६ वर्षे अमेरिकेस डाळिंब निर्यात होऊ शकली नाही मात्र आता त्यासाठी काही नियम व अटी घालण्यात आल्या. त्यामध्ये माईट वॉश, सोडियम हायपोक्लोराईड प्रक्रिया, वॉशिंग-ड्राईंग इ. प्रक्रिया करुन त्यांनी निश्चित केलेल्या मानकांनुसारच्या बॉक्समध्ये पॅकिंग करुन डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करणे इत्यादी बाबींचा अंतर्भाव आहे.

त्यानुसार अपेडा, भारत सरकार, एन.पी.पी.ओ., महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व यु-लिंक ॲग्रीटेक (आय.एन.आय.) एक्सपोर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरिकेस डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार जुलै २०२३ मध्ये प्रायोगिक तत्वावर डाळिंबाची पहिली शिपमेंट विमानमार्गे कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधा केंद्रावरुन रवाना करण्यात आली. त्यानंतर जानेवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाने डाळिंबाची आणखी एक शिपमेंट विमानमार्गे अमेरिकेला पाठवण्यात आली.

पहिल्या समुद्रमार्गे डाळिंब कंटेनरसाठी प्रथम यु-लिंक ॲग्रीटेक(आय.एन.आय.) यांच्या पॅकहाऊस येथे डाळिंबाची प्रतवारी करुन त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर सदर डाळिंब ४ किलोच्या बॉक्समध्ये भरुन त्यावर विकिरण सुविधा केंद्रात अमेरिकन इन्स्पेक्टर आणि एन.पी.पी.ओ. यांच्या अधिकाऱ्यांच्या तपासणी अंती आणि मान्यतेनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. एकूण ४ हजार २५८ बॉक्सेसमधून १४ मे. टन डाळिंबाचा कंटेनर २८ फेब्रुवारी २०२४ रोजी नाव्हा शेवा येथील जे.एन.पी.टी. वरुन समुद्रमार्गे अमेरिकेच्या नेवार्क या पोर्टसाठी रवाना करण्यात आला.अमेरिकेस भारतातून पहिल्यांदाच समुद्रमार्गे डाळिंबाचा कंटेनर निर्यात करण्यात आल्याने ही एक महत्वाची मुहुर्तमेढ रोवली गेली असून भारतीय डाळिंबांनी अत्यंत शाश्वत व मोठी अशी अमेरिकन बाजारपेठ काबीज केली जाणार असल्याने डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

### केशरी डाळिंब हे सर्वोत्तम जातींपैकी एक

सांगोला येथील अनार्नेट नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून ही डाळिंब घेतली आहेत. इतर निर्यात बाजारांच्या तुलनेत शेतकऱ्यांना मिळणारा हप्ता २० टक्के आणि देशांतर्गत बाजारपेठेच्या तुलनेत ३५ टक्के होता, हे लक्षणीय आहे. डाळिंब हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे कृषी-उत्पादन आहे.मऊ मांसल बिया, कमी आम्लता आणि आकर्षक रंगासह गुणवत्तेच्या दृष्टीने डाळिंबाच्या काही सर्वोत्तम जातींचे उत्पादन भारत करतो. केशरी डाळिंब हे जगभरातील सर्वोत्तम जातीपैकी एक मानले जाते. नजीकच्या वर्षांत डाळिंबाचे उत्पादन २०-२५ टक्क्यांच्या दराने वाढले जाणार आहे.

### या देशांना डाळिंबाची निर्यात

अपेडाने २०२२-२३ मध्ये संयुक्त अरब अमिराती (यू.ए.ई.), बांगलादेश, नेपाळ, नेदरलँड्स, सौदी अरेबिया, श्रीलंका, थायलंड, बहरीन आणि ओमानला ५८.३६ दशलक्ष अमेरीकी डॉलर्स किमतीच्या डाळिंबाची निर्यात केली आहे. डाळिंबाच्या निर्यातीसाठी पुरवठा साखळीतील अडथळे दूर करण्याकरिता अपेडा सक्रियपणे काम करत आहे. डाळिंबासाठी निर्यात प्रोत्साहन मंच स्थापन करणे हे डाळिंबाच्या निर्यातीला चालना देणारे आहे. ईईपीएफ मध्ये वाणिज्य विभाग, कृषी विभाग, राज्य सरकारे, राष्ट्रीय संदर्भ प्रयोगशाळा आणि उत्पादनाच्या दहा आघाडीच्या निर्यातदारांचे प्रतिनिधी आहेत.

### भारतीय डाळिंबाला अमेरिकेत मोठी मागणी

भारतीय डाळिंबात कर्करोगापासून लढण्यासाठी लागणारे अँन्टीऑक्सीडंट आहेत. त्वचेच्या विकारांवरील उपचारासाठी असणाऱ्या मार्गदर्शक डाएटमध्ये डाळिंबाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अमेरिकेत डाळिंबाला मोठी मागणी आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया डाळिंबाच्या जातीपेक्षा भारतीय डाळिंबाच्या जातीला जास्त मागणी आहे.